# कल्याण डोंबिवली व्हिजन

Year 08 : Issue 4 : Pages : 4 Kalyan, Dist. Thane : Tuesday 23 Nov To 29 Nov 2021 : Price 2.00 : RNI. No. MAHBIL/2014/56983

वर्ष : ०८ * अंक : ४ * पाने : ४ कल्याण, जि. ठाणे, * मंगळवार, २३ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२१ मूल्य : रु. २.००/- * नोंदणी क्रमांक एमएएचबी आयएल/२०१४/५६९८३


## भाजपच्या तीन नगरसेवकांसह विविध पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश



**कल्याण (प्रतिनिधी) :** शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक जण शिवसेनेत प्रवेश करत आहेत. भाजपच्या तीन नगरसेवकांसह विविध पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण डोंबिवलीचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षातरांचा सोहळा मुंबईत पार पडला. यावेळी बोलताना स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आगामी कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी पक्ष प्रवेश करणारी सर्व कार्यकर्ते आपले सर्वस्व पणाला लावून काम करतील अशी अपेक्षा नामदार एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

यावेळी शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केलेले नगरसेवक महेश पाटील, नगरसेविका सुनीता पाटील, सायली विचारे यांच्यासह संजय राणे, सुभाष पाटील, रवी सुदाम म्हात्रे, विजय बकडे, सुजित नलावडे, पंढरीनाथ म्हात्रे

## भाजपा विरोधात काँग्रेसच्या वतीने कल्याणमध्ये जनजागृती रॅली



**कल्याण (प्रतिनिधी) :** देशातील वाढत्या पेट्रोल, डिझेल, गॅसच्या किमती, वाढती महागाई, बेरोजगारी यासाठी भाजप सरकार जबाबदार असल्याचा आरोप करत काँग्रेसच्या वतीने कल्याणमध्ये जनजागृती रॅली काढण्यात आली, काँग्रेसच्या जनजागृती रॅलीत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित होते, ते म्हणाले की, भाजपच्या राजवटीत जनतेची लूट केली जात आहे. महाराष्ट्रात नाही तर देशभर जनजागृती केली जात आहे.

पटोले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मुंबईत भाजप क्रूझ पार्टीत आहे, भाजप नेते महाराष्ट्राची बदनामी करत आहेत, असे काँग्रेसने यापूर्वी सांगितले होते, हे बिहार निवडणुकीत दिसून आले आणि बिहार निवडणुकीत भाजपने सुशांतसिंग राजपूतचा मुद्दाही उपस्थित केला. , काँग्रेसचे नाना पटोलेंनी उत्तर प्रदेशाच्या निवडणुका जिंकण्यासाठी भाजपवर ड्रग्जचा वापर केल्याचा जोरदार आरोप करत भाजप केंद्रीय यंत्रणांचा वापर करून महाराष्ट्राची बदनामी करत असल्याचे सांगितले.

## कल्याणात महाविकास आघाडी सरकार विरोधात निषेध मोर्चा




**कल्याण (प्रतिनिधी) :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात वाढलेली राजकीय गुन्हेगारी महिला अत्याचार, शेतकऱ्यांवर, कामगारांवर होणारा अन्याय, अमरावतीमध्ये दंगलीचा निषेध करण्यासाठी भाजपतर्फे तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

या मोर्चात भाजपा आमदार रविंद्र चव्हाण, माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी सहभागी झाले होते. या मोर्चादरम्यान भाजप कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी तहसिल कार्यालयाबाहेर महाविकास आघाडी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी आमदार रविंद्र चव्हाण यांनी महाविकास आघाडीच्या काळात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडालाय, स्पॉन्सर दंगल कशी घडवावी हे अमरावतीमध्ये महविकास आघाडीने सिध्द करुन दाखवले आहे. इतर राज्यात पेट्रोल डिझेलचे दर कमी झाले मात्र महाराष्ट्रामध्ये अद्याप दर कमी झाले नाही. विज बील माफी नाही, सरकारकडून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे कोणतेच काम केले जात नाही.असा आरोप केला आहे.

## सलीम शेख व शिफा मशहर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन नाना पटोले यांच्या हस्ते संपन्न

**कल्याण (प्रतिनिधी):** जिल्हा अध्यक्ष कल्याण डोंबिवली काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग सलीम शेख, अल्पसंख्यांक विभाग जिल्हा उपाध्यक्ष शिफा मशहर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार नाना पटोले यांच्या हस्ते संपन्न झाले.



नाना पटोळे यांनी सलीम शेख व शिफा मशहर त्यांचे कौतुक केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश सचिव कोकण डिव्हिजन चेअरमन अनिस कुरेशी, अध्यक्ष मुंब्रा काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग नूर खातीब , अध्यक्ष भिवंडी अल्पसंख्यांक विभाग जुबेर अन्सारी, ठाणे ग्रामीण अध्यक्ष जावेद चिखलकर , जिल्हा अध्यक्ष कल्याण-डोंबिवली काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष जिल्हा सलीम शेख, काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग जिल्हा उपाध्यक्ष शिफा मशहर, फिरोज सय्यद, फिजा सय्यद, अनस मेमोन, लालू जामदार, पुष्पा तिवारी, अश्फाक शेख, गुलाम नबी शेख, सगीता नाईकनवरे, नर्गिस खान, रेहाना खान, आसमा पठाण, शहानो पठाण, नाजिया शेख, हुसणा शेख, नूर मोहम्मद शेख ,फर्जाना शेख, सुशील प्रसाद, अजय फुमकिया, दामोदर नैनावे आदी कार्यकर्ते पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. असंख्य नागरिकांनी सलीम शेख व शिफा मशहर यांना शुभेच्छा दिल्या.

## डोंबिवली खडेगोळवलीत दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**डोंबिवली (प्रतिनिधी) :** खडेगोळवलीमधील रामा कृष्णा कॉलनी, पार्वती नगर, श्री मलंग कॉलनी परिसरात दूषित पाणी पिल्याने गरिकांना उलट्या, जुलाबाचा त्रास होऊ लागला आहे. नागरिकांनी जवळील क्लिनिक, आरोग्य केंद्रात जाऊन उपचार घेतले असून त्यांची प्रकृती आता स्थिर आहे. परिसरातील ४० ते ५० नागरिकांना दूषित पाण्याची बाधा झाल्याने पालिका प्रशासनाने परिसराची पाहणी केली. येथील पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

कल्याण पूर्वेतील खडेगोळवली परिसरात गेल्या तीन चार दिवसांपासून दूषित पाणी पुरवठा होत आहे. हे पाणी




पिल्याने श्री मलंग कॉलनी, रामा कृष्णा कॉलनी, पार्वती नगर परिसरातील ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांसह ४० ते ५० नागरिकांना उलट्या, जुलाबाचा त्रास होऊ लागला. नागरिकांनी जवळच्या क्लिनिक मध्ये उपचारासाठी धाव घेतली. क्लिनिक मध्ये येणाऱ्या नागरिकांना सारखाच त्रास होत असल्याने दूषित पाण्यामुळे हा त्रास झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याचे नागरिक मोजेश दोडमणी या रहिवाशाने सांगितले.

नागरिकांनी विभाग प्रमुख जगदीश तरे यांच्याकडे धाव घेत याविषयी माहिती दिली. त्यांनी देखील पाहणी केली असता क्लिनिक, खडेगोळवली येथील आरोग्य केंद्रात उपचार घेतले आहेत. दूषित पाणी पिल्याने उलट्या, जुलाब होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी उप अभियंता सी. टी. सोनावणे यांच्याकडे

(पान २ वर)

## बेशिस्त रिक्षाचालकांवर आरटीओकडून कारवाई

**नवी मुंबई (प्रतिनिधी) :** नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यक्षेत्रात रिक्षाचालकांकडून प्रवाशांची अडवणूक होत असल्याच्या तक्रारींत वाढ झाल्याने उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून गेले तीन दिवस रिक्षाचालकांवर कारवाईची मोहीम हाती घेतली होती. यात साध्या वेशात आरटीओच्या अधिकाऱ्यांनी रिक्षाप्रवास केला. यातून



रिक्षाचालकांची मनमानी समोर आली. वाशी व सानपाडा विभागातील ७७ रिक्षा आरटीओकडून जप्त करण्यात आल्या आहेत. यापुढेही अचानक अशी कारवाई करण्यात येणार असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी सांगितले.

## एसटी संपामुळे विद्यार्थ्यांचीही अडचण

**मुंबई (प्रतिनिधी) :** दिवाळीच्या सुट्टीच्या वादानंतर अखेर आज, सोमवारपासून राज्यातील बहुतांश शाळा सुरू होत आहेत. मात्र, एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्याने ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांसमोर शाळेत पोहोचण्याचा प्रश्न आहे.



दिवाळीपूर्वी ग्रामीण भागांत पाचवीपासून, तर शहरी भागांत आठवीपासूनचे प्रत्यक्ष वर्ग (ऑफलाइन) सुरू करण्यात आले. मात्र, त्यानंतर सहामाही परीक्षा आणि नंतर दिवाळीच्या सुट्टीमुळे शाळा बंद झाल्या. राज्यातील बहुतांशी शाळांतील वर्ग सोमवारपासून (२२ नोव्हेंबर) नियमित सुरू होणार आहेत. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी दुसऱ्या गावातील शाळेत जावे लागते. एसटी बस ही या विद्यार्थ्यांच्या प्रवासाचे प्रमुख साधन आहे. सध्या एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्यामुळे प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्या तरी शाळेपर्यंत पोहोचायचे कसे, असा प्रश्न विद्यार्थ्यांपुढे आहे.

## बनावट नोटांपासून सावधान; ठाण्यामध्ये वाढते प्रकार

**ठाणे (प्रतिनिधी) :** नोट 'खरी की खोटी' हे ओळखताही येणार नाही, अशा पद्धतीने हुबेहूब बनावट नोटा छापून चलनात आणल्या जात असून गेल्या काही दिवसांमध्ये ठाणे आणि आसपासच्या परिसरात बनावट नोटांच्या तस्करीमध्ये वाढ झाली आहे.



मागील तीन ते चार वर्षांत ठाणे पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बनावट नोटा जप्त करत तस्करांच्या मुसक्या आवळल्या आहेत. तरीही बनावट नोटांच्या तस्करीवर 'ब्रेक' लागलेला नसून गुन्हे शाखेने नुकत्याच बनावट नोटा जप्त केल्या आहेत. अनेकदा बनावट नोटांचे धागेदोरे परराज्य तसेच भारताच्या शेजारील देशापर्यंत पोहोचत असले तरी देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करू पाहणाऱ्या बनावट नोटांमधील तस्करांना वेळीच रोखणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

## महाविकास आघाडीविरोधात भाजपाचा तहसिल कार्यालयावर निषेध मोर्चा

**कल्याण (प्रतिनिधी) :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात वाढलेली राजकीय



गुन्हेगारी, महिला अत्याचार, शेतकऱ्यांवर, कामगारांवर होणारा अन्याय, भ्रष्टचार, तसेच अमरावती दंगलीचा निषेधा करण्यासाठी भाजपातर्फे कल्याण तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चादरम्यान भाजप कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयाबाहेर महाविकास आघाडी सरकार विरोधात घोषणाबाजी करत तहसीलदार विजय पाटील यांना निवेदन सादर केले.

महाविकास आघाडी सरकार हे वसुली सरकार आहे. सरकारने नेहमीच मायबापाच्या भूमिकेत असले पाहिजे. मात्र हे सरकार विचित्र पद्दतीने वागत असल्याची टिका भाजप नेते आमदार रविंद्र चव्हाण यांनी यावेळी केली. तसेच अमरावती दंगल ही स्पॉन्सर्ड दंगल असल्यासारखे चित्र समोर यायला सुरुवात झाली

(पान २ वर)

## संपादकीय...

# !! आमरण उपोषण !!!

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान नष्ट करण्यासाठी आजपर्यंत कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्यामार्फत तीनवेळा रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तीनवेळा उद्यानाची जागा ताब्यात घेण्यात आली. दोनदा मुरबाड रोड साठी आणि एकदा रुक्मिणीबाई हॉस्पिटलकरीता यापूर्वी कल्याण



डोंबिवली महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणासाठी घेतलेली जागा आजपर्यंत पुन्हा दिलेली नाही त्या बदल्यात जागा वाढवून देण्याचे वेळोवेळी खोटे आश्वासन दिले आहे. आजपर्यंत आश्वासन पाळले गेले नाही .

आता स्मार्ट सिटीअंतर्गत सॅटिस पुलाच्या नावाखाली अर्धे उद्यान घेण्याचा प्रयत्न महानगरपालिका अधिकारी करीत आहेत सन १९९६ चा शहर विकास आराखड्याप्रमाणे शहरी भागासाठी चोवीस मीटर रस्ता परिपूर्ण आहे तरी पुन्हा उद्यानाची जागा रस्त्यासाठी का घेत आहात ?

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान ही एक ऐतिहासिक जागा आहे महानगरपालिका स्मार्ट सिटी च्या नावाने मोठमोठे उदयाने नष्ट करीत आहे .

डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची एक इंचही जागा महानगरपालिकेने किंवा शासनाने यापुढे घेऊ नये याकरिता आदरणीय लक्ष्मीबाई मारुती ससाणे या ८५ वर्षांच्या सेवाज्येष्ठ आजी काल दिनांक १९ /११/२१ रोजीपासून आमरण उपोषणाला बसल्या आहेत . शिवाय यापूर्वी तीनवेळा जी उद्यानाची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे, ती आता आहे त्या उद्यानाचा ठिकाणीच वाढवून मिळणे अत्यावश्यक आहे .आम्ही सर्व आजींसोबत आहोत. कल्याण डोंबिवली डोंबिवली महानगरपालिकेने कोणत्याही परिस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या जागेला हात लावता कामा नये . तसा प्रयत्न महानगरपालिकेकडून झालाच तर आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. आम्ही कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे पदाधिकारी माननीय उपाध्यक्षा आदरणीय ॲड. माया गायकवाड , ॲड प्रकाश जगताप , सदस्य मनीषा धिवरे आदरणीय के.डी.तायडे , ॲड. कैलास जाधव , ॲड. डी .बी वानखेडे आदी वकील महोदयांनी आजींना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या उपोषणाला जाहीर पाठींबा दिला आहे.

## शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा इतिहास शाळातून शिकवणे हीच त्यांना श्रद्धांजली

कल्याण ( प्रतिनिधी ) सर्व शाळांमधून शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवचरित्र खंडांचे वाचन झाले पाहिजे. शिवाजी महाराजांचा इतिहास जिवंत ठेऊन तो घराघरात पोहोचवण्याचे काम त्यांनी केले असे बाळासाहेब एरंडे यांनी शनिवारी येथे सांगितले.

कोकण इतिहास परिषद, सार्वजनिक वाचनालय आणि इतिहास संकलन समिती यांच्या पुढाकाराने शिवशाहीर ब. मो.उर्फ बाबासाहेब पुरंदरे यांना श्रधांजली वाहण्यात आली. त्यावेळी एरंडे बोलत होते. कल्याण हे ऐतिहासिक शहर आहे. त्यात अनेक ऐतिहासिक जुन्या वास्तू आहेत. कल्याणच्या खाडी किनारी असलेल्या दुर्गाडी किल्ल्यावर त्यांनी आरमार बांधण्याचा निर्णय घेऊन तो आमलात आणला अशा वास्तूंचे संरक्षण करून त्या जपल्या पाहिजेत असेही त्यांनी सांगितले .

सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात झालेल्या या सभेत शहरातील विविध संस्था संघटना शैक्षणिक संसंस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. अलीकडच्या काळात



सभांना गर्दी जमत नसते ,ती जमवावी लागते, बाबासाहेबांच्या शिवशाही वरील व्याख्यानांना लोक तिकीट घेऊन ( पैसे देऊन ) येत. कल्याणात शिवाजी चौकात पूर्वीच्या पठारे मैदानात अशी व्याख्यानमाला झाल्याचे छत्रपती शिक्षण मंडळाचे कर्वे यांनी सांगून बाबासाहेबांचे व शिक्षण संस्थानाचे कसे सबंध होते ते सर्वांना विशेषत: ग्रामीण भागातील शिक्षणा संस्थाना कशी मदत, मार्गदर्शन करीत.ते सांगितले

अश्वमेध प्रतिष्ठाचे आल्हाद घरत यांनी बाबासाहेबांच्या दुर्ग प्रवासातील अनेक आठवणी सांगून आजच्या तरुणांनी ऐतिहासिक स्थळांकडे केवळ गिरी भ्रमंती म्हणून न पहाता एक अभ्यास म्हणून पाहिले पाहिजे कल्याणातील काका हरदास, शिल्पकार भाऊ साठे यांच्याशी त्यांचे स्नेहाचे संबध होते. अश्वमेध प्रतिष्ठानचे अविनाश हरड यांनी बाबासाहेबांच्या हाताचे ठसे बनवले होते. या कार्यक्रमात बाबासाहेबांच्या प्रतिमे बरोबर तेही ठेवण्यात आले होते.

या कार्यक्रमात इतिहासाचे अभ्यासक ,शाहीत्यिक डॉ. श्रीनिवास साठे, पत्रकार तुषार राजे, माधव डोळे, आबा जोशी, एड. सुरेश पटवर्धन, मिलिंद कुलकर्णी भिकू बारस्कर, सुरेखा गावंडे, प्रमोद दलाल अशा अनेक मंडळींनी बाबासाहेबांच्या छत्रपती शिवाजी महाराजांवरील प्रेमाबद्दल आदर व्यक्त करून त्यांना श्रधांजली वाहिली.

## सहा आदिवासी महिलांना चोर समजून मारहाण?

**ठाणे (प्रतिनिधी)** : चोर असल्याच्या संशयावरून पोलिसांनी सहा आदिवासी महिलांना मारहाण केल्याचा आरोप आदिवासी महिलांनी केला आहे. या प्रकरणी आदिवासी महिलांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पापडी तलाव, कोळीवाडा येथे राहणाऱ्या सहा आदिवासी महिला या वसईत वेठबिगारीचे काम करतात. शुक्रवारी पापडी येथील बाजारात आलेल्या काही नागरिकांनी बाजारात चोरी झाल्याची माहिती वसई पोलिसांना दिली. त्यामुळे संशयाची सुई असलेल्या या सहा महिलांना पोलिसांनी ताब्यात घेत पापडी येथे असलेल्या चौकीत चौकशी सुरू केली. त्यानंतर या महिलांना सोडून देण्यात आले होते. मात्र चौकशी करताना मारहाण केल्याचा आरोप या महिलांनी केला. या प्रकरणी पोलिस ठाण्यात आदिवासी संघटनेतर्फे तक्रार दिली आहे.

पोलिसांनी केवळ चौकशी केली असून महिलांना कोणतीही मारहाण केली नसल्याचे परिमंडळ-२चे पोलिस उपायुक्त संजयकुमार पाटील यांनी सांगितले. या प्रकरणी तपास सुरू असून सीसीटीव्ही आणि इतर गोष्टी तपासण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल, असे पाटील यांनी सांगितले.

## कोकणात जाणाऱ्यांसाठी मोठी बातमी; रेल्वे प्रशासनाने सुरू केली 'ही' विशेष गाडी

**खेड** : कोकणात सुट्टीसाठी जाणाऱ्या प्रवाशांसाठी कोकण रेल्वे प्रशासन आजपासून पनवेल ते मडगाव ही विशेष रेल्वे गाडी सोडणार आहे. ख्रिसमस व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर रेल्वेगाड्यांना होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने कोकण मार्गावर मडगाव-पनवेल स्पेशल ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २१ नोव्हेंबरपासून ही ट्रेन धावणार आहे.



पनवेल ते मडगाव ही स्पेशल ट्रेन आजपासून ३ जानेवारीपर्यंत दर रविवारी चालवण्यात येणार असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. ०१५९६/०१५९५ क्रमांकाची ही ट्रेन मडगाव येथून सायंकाळी ४ वाजता सुटेल आणि पनवेल येथे दुसऱ्या दिवशी मध्यरात्री ३ वाजून १५ मिनिटांनी पोहोचेल.

परतीच्या प्रवासात पनवेल येथून दर सोमवारी सकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी सुटून त्याचदिवशी सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी मडगावला पोहोचेल. २२ डब्यांच्या या गाडीला रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, सावर्डे, संगमेश्वर, रत्नागिरी, आडवली, राजापूर, वैभववाडी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी, थिविम, करमाळी आदी स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने घेतेलल्या या निर्णयामुळे सुट्ट्यांच्या काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टळणार असल्याने प्रवाशांकडून समाधान व्यक्त केलं जात आहे.

**संस्थापक संपादक : राजेंद्र वखरे**
**संपादक : महादेव पंजाबी**
**उप संपादिका : वैष्णवी माळी**
पीआरबी कायद्यानुसार संपादकीय व वृत्तपत्रातील मजकुर, जाहिरातीची कायदेशीर संपूर्ण जबाबदारी महादेव पंजाबी यांच्यावर राहील. कायदेशीर बाबीसाठी न्यायक्षेत्र कल्याण.

साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वृत्त व इतर मजकूराबाबत काही वाद असल्यास साप्ताहिक प्रकाशित झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची जबाबदारी व्यवस्थापनाची नसेल. तसेच वार्ताहर, लेखक यांच्या मताशी संपादक व व्यवस्थापन जबाबदार असेलच असे नाही.

....पान १ वरुन.. दुषित पाण्यामुळे आरोग्य

आम्ही शुक्रवारी तक्रार केली. त्यानुसार शनिवारी पाणी पुरवठा विभागाचे श्याम रसाळ यांच्या टीमने सर्व चाळ परिसराची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश बाळकृष्ण तरे हे देखील उपस्थित होते. पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहे. तसेच सोमवारी पाण्याच्या जलवाहिनी ची तपासणी करून दूषित पाणी कुठे मिसळत आहे याचा आढावा घेतला जाईल असे अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे विभाग प्रमुख जगदीश तरे यांनी सांगितले.

....पान १ वरुन..

पक्षप्रवेश

, भालचंद्र म्हात्रे, प्रविण म्हात्रे, देवा माने , मोहन म्हात्रे, हनुमान ठोंबरे, विकी दिगे, उज्वला काकोले, गोरखनाथ महाले यांच्यासह शेकडो पदाधिकाऱ्यांनी शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, ग्रामीण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, सदा थरवळ, माजी महापौर विनिता राणे, दीपेश म्हात्रे, एकनाथ पाटील, महेश गायकवाड, राजेश मोरे, रमेश सुकऱ्या म्हात्रे, अर्जुन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## अ प्रभागातील मोहने भागामध्ये निष्कासन कारवाई

**कल्याण (प्रतिनिधी)** : अ प्रभागातील मोहने भागामध्ये सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामावर, विशेषत: जोत्यापर्यंत आलेली बांधकामे निष्कासित करणेची मोहिम हाती घेतली होती, त्यानुसार त्या भागातील जोत्यापर्यंत आलेल्या सर्व अनधिकृत बांधकामावर कारवाई सुरु केली होती, मंदिरावर कारवाई केली असलेबाबत बातमी काही वृतपत्रामध्ये व सोशल मिडीयावर व्हायरल झालेली आहे.तथापि सदर बातमीमधील ठिकाणी कोणतेही मंदिर आस्तित्वात नव्हते किंवा मंदिर असलेबाबतची निशाणी नव्हती त्यामुळे निष्कासन मोहिमेमध्ये सदर ठिकाणचे बांधकाम निष्कासित करणेची कारवाई सुरु केली होती.कारवाई सुरु असतानाच तेथील स्थानिक नागरिकांनी त्याठिकाणी पूर्वीपासून छोटे मंदिर आहे त्याचे वाढीव बांधकाम करणार असलेबाबत सांगितले. त्यामुळे सदर बाबीची खात्री करणेसाठी निष्कासन कारवाई थांबविणेत आली आहे. त्याठिकाणी पूर्वीपासूनच मंदिर असलेबाबतची तसेच जागेच्या मालकीबाबत संबंधिताकडून कागदपत्रे मागवून घेवून नियमानुसार उचित कार्यवाही केली जाणार आहे.

## प्रथम स्मतिदिन पुण्यस्मरण

## कै. स्वर्गीय श्री. गोपाळ विठ्ठल पांडे

जन्म १२/५/१९४३ मृत्यू १९/११/२०



सहवास जरी सुटला स्मृतीगंध देत राहिल, आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहिल

माझे लाडके बाबा.. . श्री. गोपाळ पांडे हे दि. १९ नोव्हेंबर २०२० वार गुरुवार सकाळी ७.१५ वाजण्याच्या सुमारास देवाघरी गेले. दि. १९ नोव्हेंबर २०२१ रोजी बाबांना जाऊन प्रथम वर्ष पूर्ण होत आहे. त्यामुळे बाबांच्या प्रचंड प्रेमाखातर हा लेख लिहून आदर, निष्ठा, भक्ती मी व्यक्त करीत आहे. भावपूर्ण आदरांजली वाहत आहे.

ऐतिहासिक नगरी, कल्याण हया शहरात सर्वात पहिले विश्वासू मेडिकल स्टोअर्स म्हणजे पांडे मेडिकल स्टोअर्स. पांडे मेडिकल म्हणजे वैद्यकीय चिकीत्सालयच होते. आख्या महाराष्ट्रात पांडे मेडिकल स्टोअर्स सारखे मेडिकल झालेले नाही आणि होणारही नाही. नागरिकांच्या हृदयास्थानी, शिवाजी चौकात खूप मोठे दुकान होते. माझे आजोबा, बाबा आजारी रुग्णांना समुदपदेशन, मार्गदर्शन करायचे त्यामुळे रुग्णांना डॉक्टरकडे कधी जावे लागत नव्हते. योग्य परिपूर्ण सल्ला पांडे काकांचा मिळाल्यामुळे अत्यंत आनंदाने, समाधानाने औषध विकत घेत असत. त्या औषधांना माझ्या बाबांचा, आजोबांचा हृदयस्पर्श झाल्यामुळे एक चमत्कारीक गुण यायचा. एक प्रकारची दैवीशक्तीच प्राप्त झालेली होती. मायेचा हात आणि प्रेमळ, गोड बोलण्याने रुग्ण टवटवीत, ताडकन बरा होत असे. प्रचंड आशिर्वाद त्यांना लाभलेले होते. औषधी क्षेत्रात पन्नास वर्षाचा अनुभव, प्रॅक्टीकल लाईफ लेसन त्यांना माझ्या आजोबांकडून मिळाले. चौरस आहार जसा शरीरला पोषक असतो तसेच चतुरंगी वक्तृत्व आपल्या अंगी असणं तितकंच महत्वाचं असतं. नाहितर एक जर दिली ढुशी तर पडतील पटदिशी अशी आपली तब्बेत शरीरी नसावे. माझ्या बाबांनी मला दिलेले ज्ञानामृत मी फक्त लिहित आहे. आपली प्रतिकार शक्ती ही आपली जीवनशैली व आहारशैली ह्यावर मुख्यत्वे कारणीभूत आहे. मोबाईल ॲडीक्शन हे अंमली पदार्थ सेवनासारखंच आहे. माझे बाबा म्हणायचे, अरे दिपक आपल्या शारीरिक वजनाचे आकडे व घरच्या खर्चाचे आकडे ह्यांचा नेहमी रेकॉर्ड ठेवावा.

**भावपूर्ण आदरांजली...**
**श्री स्वामी समर्थ**
**दिपक गोपाळ पांडे**
**८८७९४६५४४६.**

पिझ्झा पेक्षा भाकरीच दणकट असते, म्हणतात ना रावण पडला उताणा त्याच्या तोंडात फुटाणा. थोबाडभर सुरकुत्यांचे जाळं डोकं मात्र काळं (डाय केलेले) सध्या आपल्याकडे अशी परिस्थित आहे की एक खातो तुपाशी आणि एक राहतो उपाशी. लक्झरी आयुष्य जगू नका, सामान्य जीवनातच दिर्घायुष्य आहे. नको नेमा , नको रंभा मला प्रिय माझा खंबा अशी अवस्था तरुणाुची झालेली आहे. माझे बाबा जीभ मधाच्या बाटलीत बुडविल्याप्रमाणे सर्वांशी गोड गोड बोलत. रुग्णांचे खिसे कापण्याचे काम बाबांनी कधीही केले नही. सध्या लाईफ स्टाईल इनफ्लेशन असा प्रकार सुरु झालेला आहे. जसा पगार वाढतो, तसा खर्च वाढतो, पैसे पुरत नाहीत. अनाठायी खर्च करु नका, रुग्णांना बाळकडू पाजण्याचे काम ते उत्कृष्ट करीत. आताचे डॉक्टर हे दरवर्षी मारुतीच्या शेपटाप्रमाणे आपली फी वाढवत राहतात. धनदौलत गोळा करायची, रुग्णसेवा नाही. कमी झोपेमुळे हृदय आणि मधुमेहांचा धोका वाढला. त्यामुळे सुखनिद्रा हवीच. मोठया पडद्यावरील माणसाला गणपती एवढे मोठे कान असावे लागतात, छोटे हलके कान चालत नाही. चांद्यापासून बांद्यापर्यंत पायाला भिंगरी लावून फिरा, चालणे हा उत्तम आरोग्यवर्धक, व्यायाम औषध आहे. इन्स्टंट फुड हे आरोग्यदायी नसतं. जीवनात सतत ठेचा खाल्यामुळे एकतर प्रगती होते नाहीतर मुळव्याध. घरचं जेवण हे रुचकर, स्वादिष्ट आरोग्यवर्धक असतं. उंगलीया चाटके खाओ! यमाला टाळायचे असेल तर मसालेदार, तेलकट पदार्थांपेक्षा हलका व पातळ आहार ह्या आईबाबा हेच आपले खरे दैवत आहेत. औषधालय हे देवाचं मंदिरच असते. माझे आजोबा एक ऋषीतुल्य व्यक्तीमत्वं, ज्ञानसागर होते. सुख वेचत राहावे, मनोवरचं मडकं रिकामं ठेवू नका, ज्याच्या घ्ररात नाही पुस्तकाचे कपाट, त्याचे घर होईल भुईसपाट! देहात देव गुप्त आहे पण तो नामाने प्रकट होतो. आपल्या आयुष्याची सुरुवात आपलया रडण्याने होते आणि आपल्या आयुष्याचा शेवट हा इतरांच्या रडण्याने होतो.

मन आणि धन नेहमी स्वच्छ हवे कष्ट हेच भांडवल आणि कुटुंब हिच खरी संपत्ती मानून प्रामाणिकपणे माझ्या बाबांनी नाती जपली. माझे बाबा म्हणजे आधी केले मग सांगितले अशा स्वभावाचे होते. मला बाबा नेहमी सांगायचे, भगवंत कधीही आकाशात नसतो, मंदिरात नसतो तर तो माणसाच्या हृदयात असतो. आमचे पितृछत्र हरपले आहे, पण बाबांचे स्मरण केल्यावर एक प्रकारची उर्जा, हत्तीचे बळ येते. वडिल म्हणजे समुद्रातलं जहाज असतं, खंबीर आधाराचं दुसरं नाव असतं. घराचं वैभव आणि आशा असतो बाप अन् हृदयातील माया असतो बाप. माझ्या बाबांपेक्षा श्रीमंत मी कधी श्रीमंत पाहिला नाही. पितृदेवो भव! माझे बाबा मनमिळावू जगमित्र, सदैव हसरे आणि कुणाच्याही हाकेला धावून जाणारे एक संकटमोचक होते. चतुरस्त्र व्यक्तीम्वं होते. अनंत काळाचं नातं जोडून, अचानक आमच्यातून गेलात तुम्ही, तुमची आठवण झाली नाही असा दिवस कधी सरला नाही, तुमच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

....पान १ वरुन.. तहसिल कार्यालयावर मोर्चा

असून लोकांना त्रास देणे, सर्वसामान्य माणसांना वेठीस धरणे, हे सातत्याने सरकारच्या माध्यमातून होत असल्याचा आरोपही यावेळी त्यांनी केला. तसेच एसटी कर्मचारी आंदोलनाचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकार कोणतीही ठोस भुमिका घेतांना राज्य सरकार दिसत नाही. म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात भाजप कार्यकर्ते आणि नागरिकांकडून सरकारचा निषेध करण्यासाठी हे जन आक्रोश आंदोलन करण्यात अल्याचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

या मोर्चात भाजप आमदार रविंद्र चव्हाण, माजी आमदार नरेंद्र पवार, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत कांबळे, शहराध्यक्ष प्रेमनाथ म्हात्रे, माजी उपमहापौर मोरेश्वर भोईर, नगरसेवक मनोज राय, कल्याण पूर्व मंडल अध्यक्ष संजय मोरे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठया संख्येने सहभागी झाले होते.

# कल्याण मध्ये ओरिजन लाऊंस जिमचे उद्घाटन थाटात संपन्न
# डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शुभहस्ते जीमचे उद्घाटन



कल्याण (प्रतिनिधी) : दररोज व्यायाम करणे शरीरासाठी चांगले असते. तसेच विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळते. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सुमित आवटे यांनी आधुनिक मशीनने सुसज्ज ओरिजनल जिमचे उद्घाटन केले.

कल्याण लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे, कल्याण पश्चिम आमदार विश्वनाथ भोईर, महानगर प्रमुख विजय साळवी आणि नगरसेवक सुनील वायले यांच्या शुभहस्ते जीमचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन वेळी सुमित आवटे म्हणाले की, परिसरातील तरुणांना जिमची नितांत गरज आहे. या व्यायामशाळेत ठेवलेल्या विविध प्रकारची मशीनने तरुणांना मोठी मदत होणार आहे. येथे युवक व्यायाम करून शरीर तयार करू शकतात. आजच्या युगात आरोग्य सुरळीत ठेवण्यासाठी व्यायाम आवश्यक आहे. जिममध्ये जाऊन लोकांचे अनेक आजार दूर होतात. सुमित आवटे यांनी सांगितले की, जिममध्ये आधुनिक उपकरणे बसवण्यात आली आहेत. याचा फायदा तरुणांना होणार आहे.



यावेळी आयोजक सुमित आवटे, कोषाध्यक्ष श्री वारकरी प्रबोधन महासमितीचे महाराष्ट्र बळवंत महाराज आवटे, संतोष टेकवडे मित्रपरिवार व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# भिवंडीतील २४ गावांची तहान भागणार; खदानीतून पाणीपुरवठ्याचा पर्याय - केंद्रीय मंत्री कपिल पाटील



भिवंडी : गावालगतच्या बंद पडलेल्या धोकादायक खदानी या ग्रामस्थांसाठी डोकेदुखीच असते. मात्र, या खदानीतील साचलेल्या पाण्यातूनच पाणीपुरवठा योजना साकारण्याचा पर्याय केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सुचविला आहे. भिवंडी तालुक्यातील कालवार गावालगतच्या खदानीतून दररोज तब्बल ७ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होण्याची अपेक्षा आहे. त्यातून तब्बल २४ गावांची तहान भागविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री पाटील यांनी दिली.

देशातील प्रत्येक घराला नळाने पाणीपुरवठा करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ध्येय आहे. त्याचबरोबर त्यांनी पाण्याचे नवे स्रोतही शोधण्याची सूचना केली आहे. त्यानुसार पंतप्रधान योजना अंतर्गत विविध योजना ठाणे जिल्ह्यात राबविण्यासाठी भिवंडी तालुक्यातील कालवार येथील दगड खदानीतील प्रचंड पाणीसाठ्याची माहिती घेऊन केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी जिल्हा परिषदेला पाहणी करण्याची सूचना केली होती. त्यानुसार कालवार येथील खदानीतून दररोज ७ दशलक्ष पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकेल, असा अंदाज पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता आर. एम. आडे यांनी व्यक्त केला आहे.

# अंबरनाथ-बदलापुरात रासायनिक सांडपाणी थेट नदीत! वनशक्ती एनजीओची राष्ट्रीय हरित लवादाकडे तक्रार

ठाणे (प्रतिनिधी): राष्ट्रीय हरित लवादाने तब्बल १०० कोटी रुपयांचा दंड ठोठावल्यानंतरही अंबरनाथ आणि बदलापूरमध्ये एमआयडीसीचं रासायनिक सांडपाणी थेट नद्यांमध्ये जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. या विरोधात वनशक्ती एनजीओने राष्ट्रीय हरित लवादाकडे तक्रार केल्यानंतर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने बदलापुरातून सांडपाण्याचे नमुने घेतले आहेत. त्यामुळं एमपीसीबीला मोठा झटका बसलाय.

बदलापूर एमआयडीसीतून सोडल्या जाणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे उल्हास नदीत प्रदूषण होत असल्याचा आरोप वनशक्ती एनजीओने केलाय. बदलापूर एमआयडीसीतून सोडल्या जाणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे उल्हास नदीत प्रदूषण होत असल्याचा आरोप वनशक्ती एनजीओने केलाय.याविरोधात वनशक्ती एनजीओने राष्ट्रीय हरित लवादाकडे तक्रार केल्यानंतरही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ याकडे दुर्लक्ष करत होतं.

# सलीम शेख व शिफा मशहर यांच्यातर्फे स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महिलांना साडी वाटप



कल्याण (प्रतिनिधी) : भारतरत्न स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महिलांना साडी वाटप हा कार्यक्रम जनसंपर्क कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अल्पसंख्याक विभाग जिल्हा अध्यक्ष सलीम शेख व अल्पसंख्यांक विभाग जिल्हा उपाध्यक्ष शिफा मशहर यांनी स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आणि गुरुनानक जयंती व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. यावेळी सलीम शेख व शिफा मशहर यांनी स्व. इदिराजी गांधी यांनी देशासाठी केलेले अफाट कार्य व बलिदान दिले. आपल्या कणखर आणि सक्षम नेतृत्व द्वारे देशासाठी पुरोगामी आणि लोककल्याणकारी निर्णयाची अंमलबजावणी करणाऱ्या माजी पंतप्रधान आदरणीय स्वर्गीय इंदिरा गांधी जी यांना जयंती दिन हा साजरा करण्यात आला. सलीम शेख व शिफा मशहर हे नेहमीच प्रभागातील नागरिकांसाठी अनेक लोक उपयोगी कार्यक्रम राबवीत असतात.

सदर कार्यक्रमास अल्पसंख्यांक विभाग जिल्हा अध्यक्ष सलीम शेख, अल्पसंख्याक विभाग जिल्हा उपाध्यक्ष शिफा मशहर, जिल्हा उपअध्यक्ष फिरोज सय्यद, जिल्हा उपाध्यक्ष फिजा सय्यद, गुलाब नबी, रुमान खटखटे, मंदा कावडे, आदी मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीमती इंदिरा गांधी यांचा जयंती दिन महापालिकेत संपन्न



कल्याण (प्रतिनिधी) : भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा जयंती दिन आज महापालिकेत संपन्न झाला, महापालिका मुख्यालयात श्रीमती इंदिरा गांधी यांचे प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली. यासमयी , कार्यकारी अभियंता घनश्याम नवांगुळ, सहाय्यक आयुक्त क प्रभाग, अक्षय गुडधे ,सहा.आयुक्त स्नेहा करपे, उपसचिव किशोर शेळके , सहा. जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे आणि इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# मंदिर कारवाई प्रश्नावर सोमवारी आयुक्तांच्या बैठकीत निघणार तोडगा
## कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील यांच्या शिष्टमंडळाने घेतली पोलीस उपायुक्तांची भेट



कल्याण (प्रतिनिधी): मोहने येथील गावदेवी मंदिरावरील कारवाई प्रश्नावर सोमवारी आयुक्तांच्या बैठकीत निघणार तोडगा निघणार असून आज कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील यांच्या शिष्टमंडळाने कल्याण परिमंडळ ३ च्या पोलीस उपायुक्तांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली. यावेळी आमदार रमेश पाटील यांच्यासह कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर, माजी आमदार नरेंद्र पवार, कॉंग्रेसचे नेते प्रकाश मुथा, मनसेचे राहुल कोट आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

मोहने गाव परिसरातील जीर्णोद्धार सुरु असलेल्या गावदेवी मंदिराच्या चौथर्यावर महापालिकेच्या 'अ' प्रभाग क्षेत्र सहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्या पथकाने बुधवारी तोडक कारवाई केल्याने तसेच गुन्हा दाखल प्रकरणी मनपाच्या कारवाई विरोधात ग्रामस्थानी एलगार पुकरला असुन शुक्रवारी कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील, आमदार विश्वनाथ भोईर, माजी आमदार नरेंद्र पवार, यांनी घटनास्थळी भेट देत ग्रामस्थांना शांत राहण्याचे आवाहान केले. पोलीस उपायुक्तांची भेट घेत मोहने गावातील १००वर्षी पुर्वीच्या जुन्या गावदेवी मंदिरावर सहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी तोडक कारवाई केल्याने ग्रामस्थांच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत.

तोडक कारवाई प्रकरणी नोटीस न देता कारवाई चा बडगा उचलला कसा असा सवाल करीत हेतू पुरस्कार कारवाई केली. तसेच मनपा प्रशासनाने मंदिराच्या कामात सहकार्य करावे, अन्यथा पंचक्रोशीतील ग्रामस्थ आंदोलनाचा पवित्रा घेणार असल्याने याबाबत चर्चा अंती तोडगा काढवा असा मुद्दा उपस्थित केले. कल्याण परिमंडळ ३ पोलीस उप आयुक्त यांनी सोमवारी कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त यांच्याशी बैठक लावुन यासंदर्भात मार्ग काढणार असल्याचे सांगितले.

# कडोंमपाचे अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष



डोंबिवली (प्रतिनिधी) : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रांत असंख्य अनधिकृतपणे बांधकामे सुरु असून महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई होते. पण ती थातुरमातुर होतांना दिसत असून ज्या बांधकामांवर कारवाई केली जाते, मात्र काही काळाने तिथे पुन्हा बांधकामे होऊन इमातरी कषा उभ्या राहतात हा विचार करण्यासारखा प्रष्न नागरिकांना पडत आहे.

उदाहरणार्थ डोंबिवली पूर्वेला ग प्रभागक्षेत्रात दत्तनगर चौकात काही दिवसापूर्वी एक बांधकाम तोडण्यात आले होते व बांधकाम करण्यासाठी मज्जाव करण्यात आले असतांना त्याच इमारतीचे बांधकाम जोराने पडदे लाऊन सुरु असून त्यास महापालिकेने परवानगी दिली आहे का.

यांविशयी ग प्रभागक्षेत्रअधिकारी यांच्याषी संपर्क साधला असता बांधकाम त्वरित थांबविण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच ग व फ प्रभाग क्षेत्रासाठी उपायुक्त अनधिकृत बांधकाम यांच्याषी फोनवरुन संपर्क साधला असता ते म्हणाले ग प्रभागक्षेत्रअधिकारी योग्य ती कारवाइ करण्यासाठी सांगितले आहे व ती करतील, असे संपर्क साधला असता सांगण्यात आले.

# डोंबिवलीत पारंपरिक पद्धतीने श्रीकृष्ण-तुलसी विवाह सोहळा थाटात





कल्याण (प्रतिनिधी) : कल्याण ग्रामीण परिसरातील काटई गावात माजी सरपंच अर्जुन पाटील यांच्यातर्फे तुळशीच्या विवाह कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रमाला खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी उपस्थिती लावली होती खासदार श्रीकांत शिंदे यांनी तुळशी मातेचे पूजन केले .यावेळी कार्यक्रमानंतर ग्रामस्थांनी विविध समस्यांबाबत खासदार श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा करत समाज मंदिर हॉल, स्मशानभूमीसाठी निधी देण्याची मागणी केली .याबाबत बोलताना खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी स्मशानभूमीसाठी जागा निश्चित झाल्यानंतर पन्नास लाखांचा निधी देण्यात येईल. तसेच सामाजिक मंदिर हॉल साठी देखील निधी देऊ असे आश्वासन ग्रामस्थांना दिले.

यावेळी श्रीकांत शिंदे यांनी अर्जुन पाटील यांचे कौतुक केले. आपण असेच समाज कार्य करत रहा.या तुळशी विवाह सोहळ्यासाठी शहर प्रमुख राजेश मोरे, उपजिल्हाप्रमुख भरत भोईर, विधानसभा अध्यक्ष एकनाथ पाटील, जिल्हा परिषद सदस्य रमेश पाटील, हनुमान ठोंबरे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉक्टर ,शिक्षक, इंजिनीयर, पत्रकार,समाजसेवकांचा यांचा सन्मान केला. तुळशी विवाह सोहळ्यात हरिपाठ, लहान मुलांना मनोरंजन, महिलांसाठी होम मिनिस्टर फेम विवेक पोरजी यांनी महिलां होम मिनिस्टर गेम खेळण्यात आला. विजेता महिलेला पैठणी देण्यात आली. तुळशी विवाहाला आलेल्या सर्व महिलांना साडी भेट देण्यात आली.प्रकाश म्हात्रे, बंडू पाटील,शैलेश भोईर, सुभाष पाटील, सरपंच मुकेश पाटील, सुदर्शन पाटील, विश्वनाथ मस्कर, भरत भोईर, विलास पाटील, नरेश पाटील, सुनील पाटील, मनोज पाटील, नकुल गायकर, शाखाप्रमुख शाम पाटील, हरीश भोईर, विलास पाटील ,तुळशीराम चौधरी ,प्रभाकर पाटील ,काशिनाथ पाटील ,प्रशांत पाटील ,सुभाष पाटील, रोहिदास म्हात्रे, वेंकट म्हात्रे, दीपेश पाटील, छत्रपल सिंग, अमोल भोगले, मुकेश पाटील, मुकेश भोईर ,सुनिता फुटाणे, बबन पाटील ,अनिल पाटील ,रणजित संते ,संतोष कालन, सुनील मालणकर ,सुभाष पाटील, हनुमान महाराज ,अनंता महाराज, राम पाटील, पंडित पाटील, विश्वनाथ मस्कर, जय दुर्गामाता युवक भक्त मंडळ व ग्रामस्थ मंडळ काटई, संत गाडगेबाबा महिला हरिपाठ मंडळ काटई ,आधी कार्यकर्ते शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुळशी विवाहाचे आयोजक अर्जुन पाटील, संगीता अर्जुन पाटील, ऋषिकेश अर्जुन पाटील, प्रियंका अर्जुन पाटील यांनी केले. आलेल्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

# सर्व पक्षीय प्रतिनिधी व बाधितांची उपस्थिती सुवर्णमध्य काढण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न



**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण पूर्व विकास आराखडा अंतर्गत येणाऱ्या काटेमानिवली नाका ते गणपती मंदिर सिद्धार्थ नगर मार्गे तिसगाव नाका यू टाइप रस्ता रुंदीकरण संदर्भात विस्थापितांना प्रस्थापित करण्याच्या व पुढील रूपरेषा ठरविण्याबाबत प्रकल्पबाधित व्यापारी व नागरिका समवेत आढावा बैठक पार्वतीबाई कर्पे मॅरेज हॉल करपेवाडी कल्याण पूर्व येथे आयोजित करण्यात आली, यात मुख्यत: पुनर्वसन होणार असेल तरच प्रकल्प होऊ देणार.

प्रत्येक बाधित व्यापारी आणि नागरिक त्याच हक्क अबाधित ठेवणे.... ८० फूट रस्ता नियोजित करणे...बाधित व्यापारी नागरिक यांनी सकारात्मक भूमिका घेऊन सर्वे साठी सहकार्य करावे. इत्यादी अनेक बाबींवर चर्चा करण्यात आली.

सदरहू बैठकीस विधान परिषद सदस्य जगन्नाथ उर्फ आप्पासाहेब शिंदे, १४२ कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्र आमदार गणपत गायकवाड, कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष सचिन पोटे, माजी नगरसेवक निलेश शिंदे, महेश गायकवाड, शरद पाटील, व्यापारी संघ अधक्ष प्रकाश शंकलेशा, रिक्षा असो. अध्यक्ष सुबल डे, इतर पक्षाच्या प्रतिनिधी, व्यापारी आणि बाधित नागरिक बहु संख्येने उपस्थित होते. या सभेचे नियोजन जाणीव सामाजिक संस्था, सर्वात्मका सामाजिक संस्था, सहयोग सामाजिक संस्था आणि कल्याण पूर्व येथील जागृत नागरिक यांनी केले.

# भारतरत्न स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मुथा प्रतिष्ठान तर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन




**कल्याण (प्रतिनिधी) :** भारतरत्न स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मुथा प्रतिष्ठान तर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौक कल्याण येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. या नंतर मुथा प्रतिष्ठान याचे अध्यक्ष प्रकाश मुथा यांनी स्व.इदिराजी गांधी यांनी देशासाठी केलेले अफाट कार्य व बलिदान या बद्दल माहिती कार्यक्रमास उपस्थित कलण्या मधील नागरिकांना दिली.

सदर कार्यक्रमात एन.सी.सी विद्यार्थी यांनी पदमार्च करुन भारताच्या तिरंग्याला मानवंदना दिली. सदर कार्यक्रमास अलकाताई आवळसकर, डॉ.गिरीश लटके, संदानंद तिवारी, ओमप्रकाश पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष मेहनत कोणार्क देसाई अध्यक्ष कल्याण शहर जिल्हा इंटक, जयदीप सानप जिल्हा अध्यक्ष ओबिसी सेल, शिबु शेख जिल्हा अध्यक्ष -श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड, फाईज मुल्ला कल्याण शहर अध्यक्ष, श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड, निलेश पांडे, विक्रम राठोड, रितेश जाधव यांची उपस्थिती होती.

## कल्याण म्हारळ गावात विकासकाची मनमानी..!

# न्यायालयाच्या ऑर्डरला केराची टोपली दाखवत अनेक झाडांची केली कत्तल..!






म्हारळ पाडा येथील सर्वे क्रमांक ७०/४ या जागेवर एका विकासकाने न्यायलचा आदेशाला बगल देत व शेतकऱ्याचा विरोध झुगारून अनेक झाडे उद्धवस्त केली आहे. याबाबत शेतकरी बळीराम म्हात्रे यांनी जिल्हाधिकारी, वनाविभाग, तहसिलदार व पोलिस अधिक्षक ठाणे यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केला आहे.

कल्याण तालुक्यातील म्हारळ पाडा येथील सर्वे क्रमांक ७०/ ४ या जागेच्या वादाचा दावा न्यायालयात सुरु आहे. त्यासंदर्भातची सुनावणी गेल्या अनेक दिवसापासून न्यायालयात सुरू, असून २०२१ मध्ये न्यायालयाने विकासक, शेतकरी व कुळ असलेले स्थानिक यांना १० जानेवारी २०२२ परियांत या जागेत कोणतीही प्रकारची हालचाल अथवा काम करण्यास सक्त मनाई हुकूम काढण्यात आलेला आहे. मात्र असे असतानाही विकासकाकडून न्यायालयाच्या या आदेशाला केराची टोपली दाखवत सर्रासपणे जेसीपी लावून या परिसरातील अनेक झाडे तोडण्याचा प्रकार समोर आला आहे.

याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी व कुळा सदरी नाव असलेले बळीराम मारुती म्हात्रे व इतर ग्रामस्थांनी या विकासकावर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी, वनाविभाग, तहसिलदार व पोलिस अधिक्षक ठाणे यांच्याकडे तक्रारी अर्ज केला दाखल आहे. आता प्रशासन यावर नेमकी काय कारवाई करते याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दिव्याला सुविधा-हव्या - मनसे आमदार राजू पाटील



**दिवा (प्रतिनिधी) :** मध्य रेल्वे वरील अत्यंत महत्वाच्या दिवा रेल्वे स्थानकावरून दिवसाला हजारो प्रवासी येजा करतात. या रेल्वे स्थानकातून दिवसाला १० हजारांपेक्षा जास्त तिकीट विक्री होते पण प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा मात्र अतिशय तोकड्या आहेत. यासाठी अत्यंत महत्वाची व तातडीची कामे करण्याबाबतीतचे निवेदन एडीआरएम ॲडमिन डॉ सुमन देउळकर, सिनियर डीसीएम गौरव झा, सिनियर डीइएन एस के गर्ग यांना दिले. मनसे रेल्वे सेना अध्यक्ष. जितेंद्र पाटील, तुषार पाटील सोबत उपस्थित होते. खालील कामे निवेदनात समाविष्ट केली.

दिवा रेल्वे स्थानकातून दिवसाला १० हजारांपेक्षा जास्त तिकीट विक्री होते. तिकीटघर पश्चिमेला असून यावर प्रवाशांची मोठी लाईन लागते. त्यामुळे प्रवाशांना तासनतास वाट पाहावी लागते. दिवा परिसरात ८० टक्के लोकसंख्या पूर्वेला राहते त्यामुळे त्यांना पश्चिमेला जाऊन तिकीट काढण्याचे दिव्य करावे लागते. यासाठी दिवा पूर्वेला त्वरित तिकीट घर बांधण्याची आवश्यकता आहे. दिवा स्थानकातील केवळ प्लॅटफॉम क्रमांक १ वर शौचालय आहे. तरी दिवा पूर्वेला जागा उपलब्ध करून शौचालय बांधण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

दिवा पश्चिमेला असणाऱ्या तिकीट घराजवळची लाईन इमारतीच्या बाहेरच्या रस्त्यापाशी येते. प्रवाशांच्या सोयीसाठी तिकीट घरासमोरील उपलब्ध जागेत शेड उभे करून कार्यवाही करण्यात यावी.

# 'ग' व 'फ' क्षेत्रात अनधिकृत इमारतींवर निष्कासनाची कारवाई

**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या ग प्रभागात दिवा वसई रेल्वे लाईन जवळील श्री. कृष्णा मढवी यांच्यातळ+३-मजल्यांच्या आर.सी.सी. इमारतीच्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली.




महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देशानुसार, उपआयुक्त पल्लवी भागवत यांचे मार्गदर्शनाखाली ग प्रभाग सहा.आयुक्त रत्नप्रभा कांबळे यांनी डोंबिवली पूर्व येथील दिवा वसई रेल्वे लाईन जवळील श्री कृष्णा मढवी यांच्या-तळ+-३ मजल्यांच्या आर.सी.सी. इमारतीच्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची धडक कारवाई केली.

सदर बांधकामधारकास नोटीस बजावण्यात आली होती. सदर कारवाई फ प्रभाग सहा.आयुक्त ग व फ अतिक्रमण निर्मुलन विभागाचे कर्मचारी, महापालिका पोलिस कर्मचारी यांचे उपस्थितीत आणि-१-पोकलेन मशिनच्या सहायाने करण्यात आली.

# रोटरी क्लब ऑफ डोबिवली येथे जागतिक मधुमेह दिवस 'वर्ल्ड डायबिटीस डे' चे आयोजन






**कल्याण (प्रतिनिधी) :** रोटरी क्लब ऑफ डोबिवली नोर्थ आणि माधवबाग डोंबिवली एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक मधुमेह दिवस वर्ल्ड डायबिटीस डे' आयोजित करण्यात आला.

यावेळी फ्री शुगर चेकअप कॅम्प चे आयोजन करण्यात आले. प्रेसिडेंट रोटरी इंटरनॅशनल शेखर मेहता, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉक्टर मयुरेश वारके, प्रेसिडेंट दिनेश पोतणीस, संचालक माधवबाग डोंबिवली एमआयडीसी क्लीनिक डॉक्टर परवेज शिखलगर उपस्थित होते.

यावेळी आलेल्या नागरिकांना डायबिटीज होण्याआधीच आपण कोणत्या गोष्टीची काळजी घ्यावी याबद्दल डायबिटीज मार्गदर्शन करण्यात आली. आलेल्या पाहुण्यांचे व नागरिकांचे स्वागत करण्यात आले.

नियमित वाचा
कल्याण
डोंबिवली
व्हिजन

# सलीम शेख व शिफा मशहर यांनी घेतली पूरग्रस्त नागरिकांची दखल



**कल्याण (प्रतिनिधी) :** अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष सलीम शेख व अल्पसंख्याक विभाग उपाध्यक्ष शिफा मशहर यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोठ्या संख्येने नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या. २०१९ मध्ये पूर परिस्थितीत रेतीबंदर मधील पूरग्रस्त नागरिकांना मदत मिळाली नव्हती आणि आता २०२१ मध्येही रेतीबंदर येथील नागरिकांच्या घरात पुन्हा पाणी शिरल्याने मोठ्या संख्येने त्यांचे नुकसान झाले.

शासनाची मदत मिळावी म्हणून सलीम शेख व शिफा मशहर यांनी तहसील कार्यालयामध्ये तक्रार केल्यानंतर नागरिकांची नोंद करण्यात आली.पण अजूनही त्या नागरिकांना शासनाची मदत न मिळाल्याने तहसील कार्यालयात भोंगळ कारभार होत असल्याने २०१९ ते २०२१ पूरग्रस्त मदत मिळाली नाही. ज्या पूरग्रस्त नागरिकांची नावांची नोंद आहे पण त्यांना अजूनही पैसे मिळाले नाही.

ज्याची नोंद झाली आहे त्यांना पैसे दिल्याची नोंद आहे पण त्यांना पैसे मिळाले नाही. शिफा मशहर व सलीम शेख यांनी तहसील कार्यालयात या गोष्टीची नोंद करण्यात आली नाही. तर नक्कीच आम्ही या गोष्टीवर विचार करू असे त्यांनी म्हटले.

# माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते श्री बालाजी मेडिकल शॉपचे उद्घाटन



**मोहना (प्रतिनिधी):** मोहना टिटवाळा मंडळाचा युवा अध्यक्ष संदीप रतन पाटील व भाजपा पदाधिकारी युवा वाढ अध्यक्ष अमर पाटील यांनी शॉप नंबर २, विराट रेसिडेन्सी, अटाळी, आंबिवली, पश्चिम येथे श्री बालाजी मेडिकल शॉपचे उद्घाटन माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते संपन्न झाला.

दीड वर्षापासून कारोना काळात सर्व दुकाने बंद होती. पण मेडिकल दुकान २४ तास चालु होते. पण अटाळी गावात मेडिकल दुकान दूर असल्यामुळे अमर पाटील यांनी आपल्या प्रभागात एक भव्य असे मेडिकल दुकान ओपन केले. त्यामुळे नागरिकांना रात्री-बेरात्री दूर न जाता जवळच मेडिकलचा लाभ घेता येणार आहे. सर्व प्रकारचे औषध उपलब्ध आहेत. मोहना टिटवाळा मंडळाचे युवा अध्यक्ष संदीप पाटील, मिहिर देसाई यांनी दिवाळीच्या सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व बीजेपी कार्यकर्ते यांनी अमर पाटील यांना मेडिकल उद्घाटन प्रसंगी शुभेच्छा दिल्या.

Printed, Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed At SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT.LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai-Dist. Thane. MAHARASHTRA - 400710 Published From - Flat No 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp - Birla College Chickanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist - Thane. Pin Code - 421 301 - (Maharashtra) Mob. 09987496136, 09619630035, 08655004586 (REGD.NO. MAHBIL/2014/56983 Email - kalyandombivlivision@gmail.com

हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया, ॲण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू २३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे, एमआयडीसी ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१० जि. ठाणे - ४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे -४२१३०१ येथून छापून प्रकाशित केले (रजि. नं. एमएएचबीआयएल २०१४/५६९८३)